# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३१८ - २३ दिनांक : - १६/०९/२०२३

## मोबाईल जबरी चोरी व इतर चोरीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना अटक करुन ०९ गुन्हांची उकल वालीव पोलीस ठाणे -गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगीरी

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २७.९.२०२३ रोजी १९:२० वाजताच्या सुमारास यातील फिर्यादी हे वालीव पुर्व येथुन वालीव बाजुकडे येणारे रोडने पायी चालत जात असतांना दोन अनोळखी इसमांनी त्यांचेकडील मोटारसायकल वरुन फिर्यादी यांचे पाठीमागुन येवुन फिर्यादीचे हातातील रु. १९०००/- किंमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल जबरीने खेचुन चोरी करुन पळुन गेले म्हणुन वालीव पोलीस ठाणे गु.र.क्र. ७५१/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपी नामे १) मोहम्मद साहिल उर्फ चिरा जमाल अहमद चुरीहार, वय:१९ वर्षे, रा. मिल्लतनगर, वसई फाटा, वसई पुर्व, २) अल्फाझ ईलीयास अली शेख, वय : २४ वर्षे, रा.ठि. मिल्लतनगर, वसई फाटा, वसई पुर्व, ३) आकाश गोवींद रेडडी, वय २४ वर्ष, रा. इंदीरा वसाहत, वालीव, वसई पुर्व यांना अटक करुन वालीव पोलीस ठाणे गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे व पेल्हार पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील एकुण ९ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण ८ मोबाईल व आरोपीत यांनी गुन्हयात वापरलेली मोटारसायकल असा एकुण रु. १ लाख ३२ हजार ५०० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

-उघडकीस आलेले गुन्हे-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | गु.र.क्र. ७५१/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि.(मुळ गुन्हा) |
| २. | वालीव | गु.र.क्र. ७५४/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ३. | वालीव | गु.र.क्र. ७५६/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ४. | वालीव | गु.र.क्र. ७५९/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| ५. | वालीव | गु.र.क्र. ७६६/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| ६. | वालीव | गु.र.क्र. ७६७/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| ७. | पेल्हार | गु.र.क्र. ८५०/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| ८. | पेल्हार | गु.र.क्र. ८४१/२०२३ कलम ३९२, ३४ भा.दं.वि. |
| ९. | पेल्हार | गु.र.क्र. ८५२/२०२३ कलम ३८० भा.दं.वि. |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

----0000----